Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
ISSN No. 2456-1665

# राजकीय नेतृत्व भुमिका व कार्य

**प्रा.डॉ. अंकुशराव अंबादासराव चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना

नेतृत्व हा शब्द शिक्षितांपासन तर अशिक्षितांपर्यत सर्वानाच परिचीत आहे. याचा साधारण अर्थ पुढारपण (Leadership) असा होतो. जसे गांधीजीचे नेतृत्व, अब्राहम लिंकनचे नेतृत्व, गेल्या हजारो वर्षापासून जगाच्या कानाकोप-यात अनेक लहान थोर पुढारी होऊन गेलेत. त्यांच्या चरित्रात्मक ग्रंथानी अथवा आत्मकथांनी ग्रंथालयाचे रकानेच्या रकाने भरलेले दिसतात. या पुस्तकांमध्ये त्यांचा इतिहास तथा कार्याचा गौरव असतो. अशा प्रकारे नेतृत्वाचा अभ्यास अशी सर्वसाधारण धारणा असते. अर्थात ह्यात पुढा-यांच्या गुणांचीही चर्चा असते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व हा मुलभूत स्वरुपाचा महत्वपुर्ण घटक असून त्याचे सर्वदुर व्यापक संबंध दिसून येतात. प्रत्येक क्षेत्रात प्रभावी व्यक्तीमत्व व त्यांना मानणारी दुय्यम व्यक्तीमत्व यांच्या परस्पर संबंधावर विविध संस्था विकसित होतांना दिसतात. विविध सामाजिक शास्त्रांचा आणि विशेषतः मानसशास्त्राच्या विकासाबरोबर नेतृत्व ह्या विषयीच्या अंगोपांगावर भरपुर प्रकाश पडत असून त्यामधुन राजकीय नेतृत्वाच्या अध्ययनाचे विशाल दालन खुले झाले आहे.

सामाजीक शास्त्रांमध्ये अगर विसाव्या शतकाच्या मध्यापर्यत नेतृत्व ह्या विषयाकडे शास्त्रज्ञांचे लक्ष नव्हते. न्युयार्कच्या विशाल मुख्यालयात ४० वर्षापूवी लीडरशीप ह्या शिर्षकाखाली केवळ एकच पुस्तक आढळून आले होते. आज मात्र देश विदेशात नेतृत्वावर भरपुर लिखाण निर्माण झाले आहे म्हणूनच सेलिगमन ह्या विचारवंताने नेतृत्वाव्दारे राजकारण हे विसाव्या शतकाचे ठळक वैशिष्ट्ये म्हटले आहे.

नेतृत्व ह्या संकल्पनेबद्दल एकमत नाही त्यामुळे त्याच्या व्याख्यामध्ये बरिच भिन्नता आहे.

**नेतृत्वाच्या व्याख्या :-**

१. **लॉर्ड लॉयन.** नेतृत्व ही पुढारी बनण्याची व कायम राहण्याची कला नसून पुढाकार घेण्याची कला (Art of Leadership) आहे. ती हुकूमशाहीच्या एकदम विरोधी आहे कारण हुकूमशहा आपल्या अनुयायित्वाला विरोध करणा-या अधिकाराला मानत नाही.

२. **वेबस्टर** - एक व्यक्ती समजुन नेतृत्वाची व्याख्या केली आहे त्याच्या मते नेतृत्व म्हणजे अशी व्यकी की जी समुहाला निर्देश देते, आज्ञाकिंत करते अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते.

३. **मॅक्स वेबरने** - मात्र पुढारी व नेतृत्व ह्या शब्दात फरक केला आहे त्यांच्या मते स्वतःच्या व्यक्तीगत गुणांव्दारे तथा त्याला प्राप्त होणा-या साधन स्त्रोत त्यांच्यावरील नियंत्रणामुळे जो समुहातील लोकांना प्रायोजित तथा प्रोत्साहित करुन त्यांच्या वर्तनाला प्रभावीत करु शकतो त्याला ढोबळ मानाने नेता म्हणता येते तर नेतृत्व म्हणजे अशी व्यक्ती की जिच्यामध्ये पुढारी विशिष्ट संदर्भात आपल्या शैलीव्दारे प्रभाव तथा शक्तीचा उपयोग करतात.

४. **रिचर्ड सी स्नीडर** :- पेग यांनी निर्णय घेणा-या प्रक्रियेला नेतृत्व म्हटले आहे अर्थात राजकीय नेतृत्वामध्ये योग्यता संसूचन आणि उद्देश ह्या तीन घटकांना महत्व असून त्यांच्या परस्परावरील क्रिया प्रक्रियेतुन नेतृत्व साकार होते असे म्हणतात.

नेता (पुढारी) इतरांवर प्रभाव पाडतो अशी व्यक्ती म्हणजे नेता होय परंतु नेता व अनुयायी याचा परस्परांवर प्रभाव पडत असतो म्हणून ही व्याख्या अपुर्ण आहे समुहातील लोकप्रिय व्यक्ती म्हणजे नेता ही व्याख्यादेखील अपुर्ण आहे कारण लोकप्रियता हे नेतृत्वाचे अंगभूत लक्षण नाही तसेच समुहारवर वर्चस्व म्हणजे नेतृत्व ही व्याख्या सुध्दा अपुर्ण आहे कारण अशा प्रकारचे पुढारी वरुन लादलेले राहु शकतात.

## नेतृत्वाची भुमिका - Role of Leadership

राजकीय नेतृत्व व राजकीय पुढारी या परस्पर संबंधी परंतु अलग संकल्पना आहेत **आर एम स्टॉगडीलच्या** मते नेतृत्व केवळ एक निष्क्रिय अवस्था नाही किंवा काही गुणांचा एक समुदाय नाही तर समुहाच्या सदस्यामधील कार्यावर आधारीत परस्पर संबंध असून त्यात पुढा-याचा सहभाग सक्रिय स्वरुपाचा असतो इतरांच्या सहकार्याने नियोजीत उद्दिष्टांची पुर्ती करण्याची क्षमता पुढा-यात असते शिवाय संघटन कुशलता व सामुहिक प्रयत्नातुन आवश्यकतेच्या बाबतीत जागरुकता, परिस्थिती संबंधी अंतदृष्टी, नवनविन उपक्रमांबद्दल पुढाकार व ते पुर्ण करण्याची जिद्द तसेच आत्मविश्वासाने कार्य करणे ह्या सर्व पुढा-याच्या भुमिका आहेत.

गिबच्या मते नेतृत्व ही समुहाच्या अंतर्गत चालणारी क्रिया असल्याने पुढा-याला समुहाचे सामान्य उदिदष्ट अशा पध्दतीने निश्चित करावे लागते की, ज्यामुळे अनेकांना आपल्या अस्तित्वाव्दारे प्रत्येकाच्या काही गरजा पुर्ण होण्याचे समाधान प्राप्त होते. पुढा-याला समुहाच्या अंतर्गत स्वतःचे महत्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो पुढा-याच्या संसाधनावर त्यांच्या अनुयायांचा प्रभाव अवलंबुन असतो, त्याला समुहासाठी अनेक

साधन स्त्रोत निर्माण करावे लागतात. निर्णयासाठी पुढाकार घ्यावा लागतो. हेमकीलच्या मते भिन्न पातळ्यावर नेतृत्वाची श्रृंखला निर्माण करणे हे पुढा-याचे महत्वाचे कार्य आहे. मुल्याच्या आधारावर गटाची निर्मिती करणे, नविन सदस्याची भरती करणे, इ. समुहाच्या सदस्याच्या मुल्यमापनावर नेत्याचे पुढारीपण अवलंबुन असते. गटाचे उदिदष्ट बदलु लागल्यास त्यानुसार नविन पुढा-याची मागणी होते म्हणून अनेक चतुर व कुशल पुढारी समुहाच्या बदलत्या उदिदष्टांबरोबर स्वतःला बदलून घेतात.

समाजातील एखादी प्रभावी व्यक्ती व नेता ह्या दोन्हीमध्ये फरक असतो तसेच लोकप्रिय व्यक्ती व नेता यांच्यामधील फरक हा त्यांच्या कार्याच्या आधारावर अवलंबुन असतो. जी व्यक्ती नेत्याचे कार्य करते तिला पुढारी म्हटले जाते, पुढारी नेतृत्वाची स्वबळानुसार कार्य बदलतात ती पुढील प्रमाणे.

१. अनुयायांची निर्मिती करणे

२. समर्पण भावनेने समाजसेवा करणे

३. समुहात प्रभुत्व प्रस्थापीत करणे

४. राजकीय तथा समाजीक परिवर्तनाचे अग्रदुत एजंट म्हणून कार्य करणे

५. सत्ता मिळवीणे व लाभाचे वितरण करणे

६. लोकशिक्षण तथा प्रबोधन

७. पालकत्वाच्या भावनेतुन मार्गदर्शन

८. अनुयायी वर्गाच्या आवश्यकतांची समाधानकारक पुर्तता करणे

९. संस्था अथवा समुहाची ध्येय निश्चिती

१०.विशिष्ट उदिदष्टासाठी जनसमर्थन मिळविणे

११.राष्ट्रीय जनमत प्रभावित करणे

नेतृत्व गुणांची यादी आणखीही वाढू शकते परंतु तिचे मुल्य सिडनरच्या शब्दात निर्णय घेण्याची भुमिका (Concept of Decision making) गल्मडच्या शब्दात सार्वजनीक नीतीचे निर्धारण करणे (making of public policy) तसेच समस्याची सोडवणूक करणे (Problem solving) अथवा प्रायोजकता अशिक्षीत मतदारांना संघटीत व प्रोत्साहित करणे अशी एक ना अनेक कार्य आधुनिक कार्यवादी सिध्दान्तामधून सांगण्यात आली आहेत.

**संदर्भ ग्रंथ**


१. Laster G. kSeligman. The Study of Political Leadership micro politics Ed by John h kessel George F cole fobert G sedding published by Holf Rinehart and winsto Inc New York 1970 P. 51

२. Lord Loyd of dolobrain, leadership in Democracy ( London Oxford University Press 1939

३. Webstars New Twentigh century Dictionary of the English Language (Cleaaveland and New York The world publishing company 1960

४. B N Panday Leadership in south Asia ( New Delhi Vikas Publishing House 1977 P XIII

५. मराठी विश्वकोषातुन खंड ८ वा

६. जनार्धन ठाकुर हे नेते जनतेचे उत्कर्ष प्रकाशन पुणे १९७८